ePaper

## आमच्या धनंजय महाडिकांनीही राऊतांपेक्षा जास्त मतं घेतलेत, फडणवीसांनी जखमेवर मीठ चोळलं



| वर्ष - 6 । अंक - 67 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- अजित पवार नसते तर महाआघाडी सरकारच टिकले नसते !
- बोपखेलवर २० वर्षे अन्याय करणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांची 'चमकोगिरी'!
- संस्थेच्या प्रगतीसाठी एकोपा महत्त्वाचा - अर्जुन घोळवे

www.mahaenews.com | । शनिवार । दिनांक 11 जून 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



मी साधरणत: १२ ते १२.३० वाजता विधान भवनात पोहोचलो. मी मतदान केलं. मतदान केल्यानंतर एजंटला दाखवलं, खरं तर ही प्रक्रिया आहे. मतदान पत्रिका एजंटला दाखवल्यानंतर मी हसलो. कारण त्याला एक वेगळं कारण होतं. मतदान पत्रिका मी तिथेच बंद केली आणि माझ्या खिशात ठेवली. त्यानंतर मी बाहेर आलो आणि मतदानाच्या पेटीत मतदान टाकलं, त्यानंतर मी बाहेर निघून गेलो. परंतु मी गेटपर्यंत आल्यावर सुद्धा कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेण्यात आला नव्हता.

- **जितेंद्र आव्हाड,** गृहनिर्माण मंत्री

जे स्वत:लाच महाराष्ट्र समजतात, जे स्वत:लाच मुंबई समजतात, जे स्वत:लाच मराठी समजतात, त्या सगळ्यांना या विजयाने लक्षात आणू दिले आहे की, ते म्हणजे महाराष्ट्र नाहीत, ते म्हणजे मुंबई नाहीत. महाराष्ट्र म्हणजे राज्यातील १२ कोटी जनता आहे. भाजपला मिळालेला आजचा विजय हा आमच्यासाठी आनंदाचा क्षण आहे. भाजपचे तिन्ही उमेदवार निवडून आले. मी हा विजय आमचे लढवय्ये नेते मुक्ता टिकळ आणि लक्ष्मण जगताप यांना समर्पित करतो.

- **देवेंद्र फडणवीस,** विरोधी पक्ष नेते



### राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देत दिलेली प्रत्येक जबाबदारी मी पार पाडेन – लक्ष्मण जगताप

# आजारी असतानाही आमदार लक्ष्मण जगताप यांनी केले राज्यसभा निवडणुकीत मतदान!

### विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप आमदारांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात केले स्वागत

**। पिंपरी। महाईन्यूज ।**
**मुंबई ।प्रतिनिधी।**

राज्यसभेच्या जागांसाठी आज विधानभवनात मतदान झाले. एक एक मताची जुळवणूक महाविकास आघाडी आणि भाजपकडून सुरु होती. त्यातच पक्षाचा आदेश आहे तो पाळायलाच हवा असं म्हणत भाजपचे चिंचवडचे आमदार लक्ष्मण जगताप रुग्णवाहिकेतून थेट पीपीई कीट घालून विधानभवनात दाखल झाले आणि मतदान केले. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजप आमदारांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांनी पक्षादेश पाळला आहे. लक्ष्मण जगताप मतदानासाठी ॲम्ब्युलन्सने मुंबईत गेले. आजारापणामुळे बेडवर असूनही, जगतापांनी पक्षासाठी मोठा निर्णय घेतला. प्रवासासाठी पक्षाने चक्क एअर ॲम्ब्युलन्सची सोय केली होती. ॲम्बुलन्समध्ये खास उपचार व्यवस्थेची सोय देखील करण्यात आली. मुंबईत मतदानासाठी जायचं यावर जगताप ठाम होते. आजारापणामुळे बेडवर असतानाही पक्षासाठी जगतापांनी मोठा निर्णय घेतला आहे. जगतापांनी मतदान केलं असून आपला शब्द पाळला आहे.



#### मतदानानंतर केलेले ट्विट चर्चेत...

➡ विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी आमदार जगताप यांचे कौतुक केले. मतदानानंतर आमदार जगताप यांनी एक ट्विट केले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, भारतीय जनता पार्टीच्या मूल्यांचे आणि विचारधारांचे पालन करीत तसेच राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देत आपण दिलेली प्रत्येक जबाबदारी मी पार पाडेल. राष्ट्रकार्यासाठी सदैव कर्तव्यतत्पर राहून आपण दाखवलेला विश्वास सार्थ करण्याचा मी प्रयत्न करेन, असे ट्विट आमदार जगताप यांनी मतदानानंतर केले.

## बोपखेलची मनपा शाळा देशात सर्वोत्तम

### आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर; पहिल्या दहामध्ये स्थान

**। पुणे । महाईन्यूज ।**

**महापालिका** शिक्षण समितीचे माजी सभापती चेतन घुले यांच्या दूरदृष्टीमुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची बोपखेल येथील शाळा आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकली आहे. जगातील सर्वोत्तम शाळांना दिल्या जाणाऱ्या पुरस्काराच्या नामांकन यादीत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बोपखेल शाळेचे (इंग्रजी माध्यम) नाव जाहीर झाले आहे. या पुरस्कारासाठी शाळेने पहिल्या दहांत स्थान मिळवले आहे. असा पुरस्कार मिळवणारी देशातील ती पहिलीच शाळा ठरणार आहे. बोपखेल गावाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गेल्यामुळे मोठी समाधान असल्याचे मत घुले यांनी व्यक्त केले आहे. समाजाच्या प्रगतीत भरीव योगदान दिल्याबद्दल जगभरातील शाळांचा गौरव करण्यासाठी अमेरिकेमधील 'T4 एज्युकेशन' या संस्थेमार्फत दिला जाणारा 'USD 250,000' आज (ता. २) जाहीर झाला आहे. महापालिकेची बोपखेल शाळा गेल्या सहा वर्षापासून

आकांक्षा फाउंडेशन चालवत आहे. या संस्थेचा २५ जणांचा शिक्षकवृंद आहे. ३१६ विद्यार्थ्यांची पटसंख्या आहे. या शाळेत झोपटपट्टी, वाड्यांवस्तीमधील ज्युनिअर केजीपासून ते सहावीपर्यंत मुलांना शिक्षण दिले जाते.

मुंबईतील खोज स्कूल आणि पुण्यातील बोपखेल येथील पीसीएमसी इंग्लिश मीडियम स्कूल या 'कम्युनिटी कोलॅबोरेशन' श्रेणीतील बक्षिसासाठी निवडलेल्या टॉप १० शाळांमध्ये आहेत. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेल्या 'पुनरावलोकन पॅनेल'द्वारे जगभरातील शाळांमधील हजारो अर्जांची फेरतपासणी केल्यावर बोपखेल शाळेची निवड करण्यात आली.

"**महापालिका** शिक्षण समितीचे सभापती म्हणून काम करताना विद्यार्थ्यांना अत्याधुनिक सोयी-सुविधा पुरवल्या. बोपखेलसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हणून ते कुठेही कमी पडू नये यासाठी अनेक बदल केले त्याची प्रचिती आता येत आहे. माझ्या बोपखेल गावातील प्रत्येक गोरगरीब विध्यार्थंना इंग्लिश माध्यमांमध्ये शिकता यावे. यासाठी केलेला प्रयत्न आणि त्याची प्रचिती आता येत आहे.

- **चेतन घुले,** माजी शिक्षण समिती सभापती, पिंपरी- चिंचवड महापालिका



## शॉर्ट न्यूज »

### शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करण्याचे निर्देश



पुणे । महाईन्यूज ।

विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आस्था आणि ओढ निर्माण होण्यासाठी विदर्भात 27 जून रोजी आणि उर्वरित राज्यात 15 जून रोजी प्रवेशोत्सव साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळेच्या परिसरातील 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याची खात्री करून शाळापूर्व तयारीच्या काळात शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना प्रवेश द्यावा, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी शिक्षण संचालक, विभागीय उपसंचालक, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

### आमचं राजकारणच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अवलंबून - दिलीप मोहिते

# अजित पवार नसते तर महाआघाडी सरकारच टिकले नसते !

### काँग्रेसचे खेडचे आमदार दिलीप मोहिते यांचा खळबळजनक दावा

।मुंबई। महाईन्यूज । प्रतिनिधी

गेल्या दोन ते अडीच वर्षांत मंत्रालयात आल्यानंतर फक्त अजित पवारच असायचे. सगळ्या पक्षाचे आमदार त्यांना भेटून समस्या सांगायचे. ते सर्वांना मदत करण्याचे काम करायचे. कदाचित अजित पवार नसते, तर हे महाविकास आघाडी सरकारसुद्धा टिकलं नसतं, असा खळबळजनक दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे खेडचे आमदार दिलीप मोहिते यांनी केला. खेड तालुक्यातील प्रश्न मार्गी लागत नसल्यामुळे आमदार मोहिते यांनी राज्यसभा निवडणुकीच्या



दिवशी नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्याशी चर्चा करत त्यांना मतदानास राजी केले. नाराज मोहिते यांनी माध्यमाशी बोलताना आपली नाराजी दर्शविली होती. ते म्हणाले की, महाविकास आघाडी सरकार खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच चालवले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आमच्यासाख्या

⏭ महाविकास आघाडी सरकार खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच चालवले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आमच्यासाख्या आमदारांचा ते विचार करतात, तर बाकीच्यांनी का करू नये. माझ्यावर अन्याय होत असेल तर मी काहीतरी भूमिका घेतली पाहिजे.

आमदारांचा ते विचार करतात, तर बाकीच्यांनी का करू नये. माझ्यावर अन्याय होत असेल तर मी काहीतरी भूमिका घेतली पाहिजे. गेली एक वर्षभर मंत्रालयात आमच्या खेड तालुक्यातील विकास कामांसदर्भातील फायली पडून आहेत. त्यात माझा काही दोष नाही, त्या काही माझ्या वैयक्तीक कामाच्या नाहीत. खेड तालुक्यातील पंचायत समिती, पोलिस ठाणे, प्रशासकीय इमारतींच्या संदर्भातील त्या फायली आहेत. या सर्व गोष्टी संपूर्ण खेड तालुक्याच्या आहेत आणि मी तालुक्यासाठी मागतोय, त्याला आडकाठी आणण्याचे काही कारण नाही. असले राजकारण कोणी करू नये. आमचं राजकारणच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अवलंबून आहे, त्यामुळे त्यांनी सांगितले येथे बटण दाब की आम्ही ते बटन दाबणार. त्यांना मतदान कर, असे म्हटलं की आम्ही करणार आहे.

# पुण्यात भाजपाच्या फ्लेक्सवरून माजी महापौर गायब !

### भाजपातील अंतर्गत गटबाजीची चर्चा पुन्हा सुरु

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी पुण्यात शहरभर लावलेल्या फ्लेक्सवर माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना टाळण्यात आले आहे. शहराध्यक्ष जगदीश मुळीक यांनी शहराध्यक्ष म्हणून स्वतंत्रपणे तर माजी सभागृह नेते गणेश बिडकर व स्थायी समितीचे माजी अध्यक्ष हेमंत रासने यांनी एकत्रितपणे लावलेल्या फ्लेक्सवरदेखील माजी महापौर मोहोळ यांना टाळण्यात आले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहरात अनेक ठिकाणी फ्लेक्स पाहायला मिळाले. शहर भाजपच्या वतीने शहरातील मोक्याच्या विविध जागांवर



मोठे फ्लेक्स उभारण्यात आले आहेत. मात्र, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचा फोटो लावण्यात आलेला नाही. शहरातील विविध भाजपा नेत्यांचे फोटो असताना महापौर राहिलेले मोहोळ यांचा फोटो का लावला नाही, अशा चर्चा आता रंगू लागली असून या माध्यमातून भाजपातील अंतर्गत गटबाजीची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. कोथरूडचे आमदार असलेले चंद्रकांत पाटील पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. त्यामुळे कोथरूडसह शहराच्या विविध भागात पाटील यांना शुभेच्छा देणारे मोठ्या आकाराचे फ्लेक्स लावण्यात आले आहेत. या फ्लेक्सवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा तसेच पुण्याचे खासदार गिरीश बापट यांच्यासह अनेक नेत्यांची फ्लेक्सवर फोटो आणि नावे दिसली. मात्र, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचा फोटो सोडाच साधा उल्लेखदेखील टाळण्यात आल्याचे दिसत आहे.

■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे शहरात अनेक ठिकाणी फ्लेक्स पाहायला मिळाले. शहर भाजपच्या वतीने शहरातील मोक्याच्या विविध जागांवर मोठे फ्लेक्स उभारण्यात आले आहेत. मात्र, पुण्याचे माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांचा फोटो लावण्यात आलेला नाही. शहरातील विविध भाजपा नेत्यांचे फोटो असताना महापौर राहिलेले मोहोळ यांचा फोटो का लावला नाही, अशा चर्चा आता रंगू लागली असून या माध्यमातून भाजपातील अंतर्गत गटबाजीची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.



# चंद्रकांत पाटलांनी हिमालयात जाऊन डोक्याला तेल लावावं ...

### राष्ट्रवादीच्या रुपाली पाटलांचा खोचक सल्ला!

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी

राज्यात सध्या राज्यसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय वातावरण तापलं आहे. सत्ताधारी आणि विरोधकांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती.

यासंदर्भात राजकीय दावे-प्रतिदावे होत असताना पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपामध्ये वेगळाच कलगीतुरा रंगताना दिसू लागला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली ठोंबरे-पाटील यांनी चंद्रकांत पाटील यांना तेलाची बाटली, साबण, ब्रश आणि गोळा केलेला निधी कुरिअरने पाठवला आहे.

**"वास्तविक त्यांनी हिमालयात जायला पाहिजे, पण.."**

⏩ चंद्रकांत पाटील यांनी निवडणुकांसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा यावेळी रूपाली पाटील यांनी उल्लेख केला. "राज्यात कुठेही निवडणूक लावा. मी जर निवडून आलो नाही, तर हिमालयात जाईन, असं विधान भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आणि कोथरूडचे आमदार चंद्रकात पाटील यांनी केलं होतं. मात्र कोल्हापूर येथील पोटनिवडणूक चंद्रकांत पाटील लढले नाहीत.

### भाजपाच्या विकासकामांवर श्रेय लाटण्याचा प्रकार

# बोपखेलवर 20 वर्षे अन्याय करणाऱ्या राष्ट्रवादीच्या नेत्यांची 'चमकोगिरी'!

### भाजपचे माजी नगरसेवक विकास डोळस यांची टीका

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून २० वर्षे बोपखेलला विकासकामांपासून वंचित ठेवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांनी आता निवडणुकीच्या तोंडावर चमकोगिरी सुरू केली आहे. वास्तविक, भाजपाने केलेल्या विकासकामांची पाहणी करुन राजकीय श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न राष्ट्रवादीकडून केला जात आहे, अशी टीका भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांचा पिंपरी-चिंचवड दौरा आयोजित केला आहे. या दौऱ्यामध्ये शहरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची पाहणी करण्यात येत आहे. यासंदर्भात भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांवर टीका केली आहे.

विकास डोळस म्हणाले की, शहरातील विकासकामांची पाहणी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार करीत आहेत. मात्र, राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांकडून भाजपानेच मंजुर केलेली आणि सुरू केलेली कामे पाहणीचा दौरा आखला जातो. महापालिकेत प्रशासक राजवट लागू झाली असल्यामुळे त्याआडून राष्ट्रवादी आगामी निवडणुकीसाठीचा छुपा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न करीत आहे. वास्तविक, चिखली जलशुद्धीकरण प्रकल्प आणि आंद्रा भामा आसखेडच्या पाण्यावरुन राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी भाजपावर आरोप केले. त्याच कामाची अजित पवार यांच्याकडून पाहणी करुन घेतली. हा प्रकल्प आम्हीच मार्गी लावला, असी बतावणी जाहीरपणे केली. आता बोपखेलमध्ये वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला उड्डाणपूलाच्या कामासाठी भाजपाचे आमदार लक्ष्मण जगताप आणि महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला होता. त्यामुळे उड्डाणपुलाचे काम मार्गी लागले. मात्र, आता राष्ट्रवादी या पुलाच्या कामाचे श्रेय घेण्यासाठी पुढे येत आहे.

**एसटीपी प्रकल्प बंद पाडल्याची राष्ट्रवादीला विस्मृती...**

बोपखेलमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी भाजपाने मंजूर केलेल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला राष्ट्रवादीच्या नेत्यांनी विरोध केला. या प्रकल्पासाठी भाजपा सत्ताकाळात निविदा काढण्यात आली. त्यावर आक्षेप घेण्यात आला. प्रशासनाने पुन्हा निविदा काढली. तरीही राष्ट्रवादीने या प्रकल्पाला खोडा घातला. बोपखेलकरांच्या नागरी आरोग्याच्या दृष्टीने आणि नदी संवर्धनासाठी आवश्यक असलेला हा प्रकल्प गुंडाळण्यासाठी राष्ट्रवादीने प्रशासनावर दबाव निर्माण केला. राष्ट्रवादीच्या माजी पदाधिकाऱ्याने हा प्रकल्प बंद करण्याच्या सूचना अजित पवार यांनी दिल्या त्यामुळे प्रशासनाने कारवाई केली, असे जाहीरपणे प्रसारमाध्यमांना सांगितले. आता हेच राष्ट्रवादीचे पदाधिकारी बोपखेलमध्ये विकासकामांची पाहणी करण्याचे ढोंग करीत आहेत. राष्ट्रवादी आणि त्यांच्या नेत्यांना हा दुटप्पीपणा शोभतो का? असा

**20 वर्षात झाले नाही, ते 5 वर्षात झाले...**

महापालिकेत समाविष्ट झाल्यापासून बोपखेलवर राष्ट्रवादीकडून अन्याय झाला. एकाही महत्त्वाचा प्रकल्प बोपखेलमध्ये झाला नाही. भाजपाच्या पाच वर्षांच्या काळात उड्डाणपुल, संरक्षण विभागाच्या हद्दीतील रस्ते, बहुद्देशीय इमारत, कर संकलन कार्यालय, जलवाहिनी, पाणी प्रश्न, उद्यान विकसित करण्यासाठी भाजपाने पुढाकार घेतला. गेल्या २० वर्षांत जी कामे राष्ट्रवादीने केली नाही, तेव्हढी पाच वर्षांत भाजपाने केली. मात्र, आता निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी प्रशासकाच्या आडून श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत आहे, असेही विकास डोळस यांनी म्हटले आहे.

---

### मावळ असोसिएशन ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचा मेळावा

# संस्थेच्या प्रगतीसाठी एकोपा महत्त्वाचा - अर्जुन घोळवे

### वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन, सचिव संजय पटनी यांची माहिती

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



एखादी संस्था यशस्वी कधी होते, तर त्यामध्ये ऐकी असावी लागते... एकीच्या बळातून संस्थेच्या यशाचा पाया रचला जातो. सुरेश मोहीते यांच्या संकल्पनेतून हा पाया रोवला गेला. त्याच भक्कम आधारावर वाटचाल करणाऱ्या या संस्थेचा प्रमुख म्हणून काम पाहताना मला विशेष समाधान वाटते, असे मत मावळ असोसिएशन ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष अर्जुन घोळवे यांनी व्यक्त केले. मावळ असोसिएशन ऑफ इन्फॉर्मेशन ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने संस्थेचे 'गेट टूगेदर'नुकतेच पार पडले. यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष बालाजी अय्यर, परेश वडके, कमल वनवारी, विजय नाईक, प्रदीप गाडे, शंकर घोलप, सुधीर पठारे, राकेश भसीन, युनायटेड पेरिफेरल्स चे सुनील गुगळे, इशा एंटरप्राईझेसचे राहुल मुथ्था, जे.एस. एंटरप्राईझेसचे मनोहर रजवाणी आदी उपस्थित होते. अर्जुन घोळवे म्हणाले की, कॉम्पुटर्स खरेदी-विक्री क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिक, डिलर्सना संघटीत करुन त्यांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी मावळ असोसिएशन ऑफ इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी... या संस्थेची स्थापना झाली. सुरेश मोहीते यांना हे असंघटीत लोकांसाठी लावलेले रोपटे आता वटवृक्ष झाले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत आपण सर्व व्यावसायिक निश्चितपणे व्यावसायिक प्रगती करीत आहोत, यात शंका नाही. कोविड आणि लॉकडाऊनमुळे गेल्या दोन वर्षांत संस्थेच्या वतीने घेण्यात येणारे विविध उपक्रमांची परंपरा खंडित झाली. मात्र, आता कोविडचे सावट दूर झाले आहे.

> सुरेश मोहीते यांना हे असंघटीत लोकांसाठी लावलेले रोपटे आता वटवृक्ष झाले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत आपण सर्व व्यावसायिक निश्चितपणे व्यावसायिक प्रगती करीत आहोत, यात शंका नाही. कोविड आणि लॉकडाऊनमुळे गेल्या दोन वर्षांत संस्थेच्या वतीने घेण्यात येणारे विविध उपक्रमांची परंपरा खंडित झाली. मात्र, आता कोविडचे सावट दूर झाले आहे. व्यावसायिक अडचणींवर मात करीत आपण संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम घेणार आहोत.

---

### हॉटेल मालक आणि कामगाराला मारहाण, परस्पर विरोधात गुन्हे दाखल..



**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

हॉटेल मध्ये कचरा साफ करण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून आठ जणांनी मिळून हॉटेल मालक आणि कामगाराला मारहाण केली. ही घटना बुधवारी (दि. 8) रात्री नऊ वाजता हॉटेल मोशी ग्रँड येथे घडली. याप्रकरणी परस्पर विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत

प्रल्हाद मनमोहन सरकार (वय 39, रा. मोशी) यांनी याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अनिकेत बोराटे (वय 25), विशाल बोराटे (वय 30), अशोक बोराटे (वय 35), तनोज

## संपादकीय »

# विद्यार्थी, परीक्षार्थी ते ज्ञानार्थी

***विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि शिक्षणोत्तर व्यावसायिक भवितव्याच्या दृष्टीने दहावी आणि बारावी या इयत्तांच्या परीक्षांना पूर्वीइतके महत्त्व आता राहिलेले नाही हे खरे; परंतु या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या (दोन्ही मिळून सुमारे तीस लाख) शिक्षणाचा विस्तारणारा परीघ दर्शविणारी असल्याने, समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्या महत्त्वाच्या ठरतात.***

या परीक्षांत नव्वद टक्क्यांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण होण्यास सुरुवात होऊनही अनेक वर्षे लोटली. यामुळे गुणवत्ता खालावत असल्याचे गळे काढणारे काही कमी नाहीत. जेव्हा उत्तीर्णांचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास असायचे, तेव्हा यांपैकीच अनेक निम्मे विद्यार्थी का अनुत्तीर्ण होतात, असा प्रश्न करीत. उत्तीर्णांच्या प्रमाणाचा लंबक कोणत्याही दिशेने गेला, तरी त्याच्या विरोधात मत मांडणारे असतातच; त्यामुळे अशा मतांकडे अधिक लक्ष न देता, बारावीच्या निकालाचा अर्थ समजून घ्यायला हवा. परीक्षेला बसणाऱ्या तेरा लाख विद्यार्थ्यांपैकी किती जण त्यांच्या कुटुंबातील बारावीपर्यंत पोहोचणारे पहिलेच आहेत, किती विद्यार्थी उपेक्षित आणि वंचित घटकांतील आहेत, किती जण दुर्गम भागांतील आहेत, अशा सर्वांमधील उत्तीर्णांचे प्रमाण काय आहे; विशेष प्रावीण्य, प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ग या विविध श्रेणींमधील विद्यार्थ्यांचे प्रमाण किती आहे, शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या; तसेच मुलगे आणि मुली यांच्यातील उत्तीर्णांच्या प्रमाणात किती अंतर आहे आदी प्रश्नांचा शोध या निकालातून घेतल्यास शिक्षणाचे सामाजिक संदर्भ समजतात.

गेल्या वर्षी कोव्हिडमुळे बारावीची परीक्षा होऊ शकली नव्हती. अंतर्गत मूल्यांकनाद्वारे निकाल जाहीर करण्यात आला. यंदा कोव्हिडचे सावट कमी झाल्याने परीक्षा घेण्यात आली; परंतु प्रमुख विषयांच्या लेखी परीक्षांत किमान एक दिवसाचा खंड ठेवण्यापासून उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी तीस मिनिटांपर्यंत वेळ वाढवून देण्यापर्यंतच्या सवलती देण्यात आल्या. त्याचबरोबर प्रात्यक्षिकांना बाह्य परीक्षकही नव्हते. या साऱ्याचा परिणाम उत्तीर्णांची टक्केवारी वाढण्यात होणे स्वाभाविक आहे. यंदा उत्तीर्णांचे प्रमाण ९४.२२ टक्के असून, ते २०२०च्या तुलनेत साडेतीन टक्क्यांनी अधिक आहे. मुलींची कामगिरी मुलग्यांपेक्षा चांगली होण्याची परंपरा यंदाही कायम आहे. उत्तीर्णांचे प्रमाण मुलींत ९५.३५, तर मुलग्यांत ९३.२९ टक्के आहे.



## आनंदी सकाळ

# 'चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।

पवित्रता ज्या त्यागाहून सहनशीलतेतून प्रकट होते, हे सर्वशील-चारित्र्याचे मूलभूत गुण व देवतुल्य मनोवृत्ती आहेत. म्हणून भारतीय सौंदर्यबोधही अशा उच्च गुणांनी युक्त आहे. जे शीलवान आहे, ते सुंदर आहे; कारण ते निष्कलंक आहे, शुद्ध आहे. म्हणूनच ते मोहक व अनुपम आहे. नारी-नारायणी रूप नैतिक सौंदर्याचा समुच्चय आहे. मातृरूप, मातृभाव या सौंदर्याचा सर्वोत्तम अनुभव आहे. पुत्र हा कुपुत्र होऊ शकतो; परंतु माता ही कधीच कुमाता होत नाही, असा दृढ विश्वास 'आई' या दोन अक्षरांत आहे. नारदाने भक्तीच्या एकादश आसक्तीत वात्सल्याचा अंतर्भाव केला आहे. संतांनी ईश्वरास, सद्गुरूस माऊली भावाने हाक मारली. 'मातृदेवो भव' ही सार्वकालिक आस्था आहे. भारतीयांनी याच मनोभूमिकेत मातृभूमीस 'आई'च्या उदात्त भावनेने स्वीकारले; त्यामुळे भारतीय अध्यात्म हे सतत सर्वोदय व राष्ट्रोद्धाराशी एकरूप आहे. आत्मज्ञानाचा प्रकाश उजळण्याची व अज्ञान, भ्रममायेने प्रभावित अज्ञानाचा अंधार नाहीसा करण्याची सदिच्छा भारतीय साहित्यात नित्य व्यक्त झाली आहे. ज्ञानाची सुंदर पहाट होण्यासाठी भाव इच्छा, बुद्धी, विचार, आकांक्षा, श्रद्धा, कल्पना आदी शुद्ध विशाल, नि:स्वार्थी, पवित्र, समदर्शी असणे आवश्यक आहे.

# मागे बसणाऱ्याला हेल्मेटसक्ती योग्य की अयोग्य?



## भूमिका



मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी ९ जूनपासून दुचाकीवर मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेट सक्तीचे केले आहे. यासोबतच नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही वाहतूक पोलिसांनी दिलाय. विशेष म्हणजे तत्पूर्वी हा नियम लागू करण्यासाठी १५ दिवसांची मुदतही दिली होती, ती मुदत ८ जून रोजी संपली आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात दुचाकी अपघाताच्या घटना वाढत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी मागे बसणाऱ्यालाही हेल्मेटसक्ती केलीय. मागे बसणाऱ्याने हेल्मेट न घातल्यास ५०० रुपये दंड आणि तीन महिन्यांसाठी लायसन्स रद्दच्या शिक्षेची तरतूदही केलीय. पण आता या निर्णयामुळे दुचाकी चालकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. मुंबईच्या वाहतूक पोलिसांचा हा नियम जाचक असल्याचं अनेकांचं म्हणणं आहे. प्रत्येक वेळी मागच्याने हेल्मेट घालणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न आता मोटारसायकल चालकांमधून उपस्थित केला जात आहे. मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी ९ जूनपासून मागे बसणाऱ्यांनाही हेल्मेट सक्तीचे केले आहे. यासोबतच नियम मोडणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही वाहतूक पोलिसांनी दिलाय. विशेष म्हणजे तत्पूर्वी हा नियम लागू करण्यासाठी १५ दिवसांची मुदतही दिली होती, ती मुदत ८ जून रोजी संपली आहे. त्यामुळे ९ जूनपासून मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवली आहे.

आता बाईकच्या मागे बसणाऱ्याने हेल्मेट न घातल्यास वाहतूक अधिकारी कारवाई सुरू करतील. बहुतांश दुचाकीस्वार हेल्मेट घालत नाहीत आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात, असे वाहतूक पोलिसांना आढळून आले आहे. सध्या वाहतूक पोलीस हेल्मेट नसणाऱ्या दुचाकीस्वारांकडून ५०० रुपये दंड आकारतात किंवा त्यांचे परवाने निलंबित करतात. मात्र वाहतूक नियमांनुसार हेल्मेट न घालता दुचाकी चालवल्यास तुम्हाला दंडही होऊ शकतो हे ऐकून तुम्हाला आता धक्का बसला असेल.

# सर्वसामान्यांच्या घराची परवड थांबावी !

**गोरेगावमधील पहाडीसारख्या जागेचा अपवाद सोडल्यास म्हाडाकडे सध्याच्या घडीला मुंबई शहर वा उपनगरात एकाही ठिकाणी मोकळी जागा उपलब्ध नाहीय, त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पांतूनच अधिकाधिक तयार घरं मिळवणं हा एकच पर्याय सध्या म्हाडासमोर शिल्लक आहे. म्हणूनच प्राधिकरणाने पुनर्विकास प्रकल्प विनाअडथळा कसे राबवता येतील याकडे गांभीर्याने बघण्याची गरज आहे. त्यांच्या कामाला गती देऊन ते लवकरात लवकर पूर्णत्वाला न्यायला हवेत, तेव्हा कुठे सर्वसामान्यांच्या घरांची परवड थांबू शकेल.**

मुंबईत आपलं स्वत:च्या हक्काचं घर असावं, बैठ्या चाळी किंवा जीर्ण इमारतीची वेस ओलांडून कधी ना कधी नव्या कोऱ्या घरात प्रवेश करावा असं स्वप्न प्रत्येक मुंबईकर उराशी बाळगून असतो. हे स्वप्न साकारण्यासाठी धकाधकीच्या या शहरात तो अव्याहत राबत असतो. परंतु मुंबईसह उपनगरातील जागेची टंचाई, अत्यंत मर्यादित संख्येने उभे राहणारे नवे गृहप्रकल्प आणि खासगी गृहप्रकल्पांतील कोटी कोटींची उड्डाणे घेणाऱ्या घरांच्या किमती ऐकून त्याचा हिरमोड झाल्यावाचून राहात नाही. गृहस्वप्न साकारण्यासाठी उत्सुक असणारे असे असंख्य मुंबईकर दरवर्षी एका गोष्टीची मात्र आतुरतेने वाट बघत असतात,



ती म्हणजे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण अर्थात म्हाडाच्या लॉटरीची. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी नुकतीच म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या लॉटरीची घोषणा केल्यामुळे सर्वसामान्यांमध्ये आनंदाची लाट पसरलीय.

गोरेगाव येथील पहाडी परिसरात म्हाडाच्या मुंबई मंडळाचा एक प्रकल्प आकारास येतोय. या प्रकल्पाला जितेंद्र आव्हाड यांनी भेट देऊन प्रगतीपथावर असलेल्या कामाची पाहणी केली. हे काम पूर्ण होऊन या सदनिका गृहखरेदीदारांना लवकरच वाटपासाठी खुल्या होतील, कदाचित दिवाळीपर्यंत; याची दाट शक्यता त्यांना वाटत असल्याने या प्रकल्पाला भेट देऊन आल्यानंतर त्यांनी लागलीच दिवाळीत ३ हजार घरांची सोडत निघेल, अशी घोषणा करून टाकली. या घोषणेमुळे सर्वसामान्य गृहखरेदीरांमध्ये नवी उमेद जागी झालीय. अनेकजण पैशांची जुळवाजुळव करण्याच्या तयारीलाही लागलेत. गृहमंत्र्यांच्या घोषणेनुसार सर्वकाही सुरळीत झालंच तर अनेकांची दिवाळी वा नवं वर्ष नव्या घराची चावी हाती घेऊनच साजरं होईल, असं म्हणायला हरकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



सांगतों तें तुम्हीं अइकावें कानीं ।
आमुचे नाचणीं नाचूं नका ॥१॥
जोंवरी या तुम्हां मागिलांची आस ।
तोंवरी उदास होऊं नका ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज »

### सहप्रवाशी हेल्मेटसक्ती प्रकरणी धडाका सुरुच



**। मुंबई ।** सहप्रवाशी हेल्मेट सक्तीप्रकरणी दुसऱ्या दिवशीही वाहतूक पोलिसांची कारवाई सुरु होती. शुक्रवारी दिवसभरात वाहतूक पोलिसांनी 6 हजार 635 बाईकस्वाराविरुद्ध दंडात्मक कारवाई केली होती. गुरुवार 9 जूनपासून बाईकस्वारासोबत प्रवास करणाऱ्या सहप्रवाशांना हेल्मेट सक्ती करण्यात आली होती. या कारवाईची अंमलबजावणी गुरुवारी सुरु झाल्यानंतर वाहतूक पोलिसांनी 6 हजार 271 बाईकस्वारासह सहप्रवाशांवर कारवाई केली होती. त्यात बाईकवरुन प्रवास करणाऱ्या 2 हजार 334 चालक, 3 हजार 421 सहप्रवाशी आणि दोघांनी हेल्मेट घातले नाही अशा 516 जणांवर कारवाई केली होती.

राज्यातील सर्व घटकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न राष्ट्रवादीकडून होईल, जयंत पाटील यांनी व्यक्त केली अपेक्षा

# राष्ट्रवादीला राज्यातील सर्वात मोठा पक्ष करण्यासाठी एकसंघ प्रयत्न करुया!

## जयंत पाटील यांचे कार्यकर्ते, नेत्यांना आवाहन

**। मुंबई । महाईन्यूज ।**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २३ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यातील सर्वात मोठा पक्ष करण्यासाठी एकसंघ प्रयत्न करुया असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना केले आहे. जयंत पाटलांच्या हस्ते राष्ट्रवादी भवन, मुंबई येथे ध्वजारोहण करण्यात आले. पक्षाच्या ताकदीवर आपली सत्ता स्थापन होईल असा निर्धार केला होता याची आठवणसुद्धा



जयंत पाटील यांनी करुन दिली. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राष्ट्रवादीच्या वर्धापन दिनानिमित्त कार्यकर्त्यांशी संवाद साधला. पाटील म्हणाले की, तुम्हा सर्वांचे कष्ट, प्रयत्न, जिद्द यातूनच आपला पक्ष इथपर्यंत आला आहे. याची आम्हा सर्वांना जाणीव असून राष्ट्रवादी हा पक्ष आपल्याला महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष करायचा आहे. यासाठी एकसंघपणे प्रयत्न करूया असे आवाहन जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना केले आहे. कार्यकर्त्यांच्या एकजुटीने पक्षाला मिळालेल्या उभारीबद्दल जयंत पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.दरम्यान, आपला पक्ष तेवीस वर्षांचा झाला आहे. आपल्या पक्षामध्ये महाराष्ट्रातील नव्या पिढीला भविष्यातील आशा दिसत आहे. अनेक तरूण पक्षात काम करण्यास इच्छुक आहेत.

### पक्षात पहिला प्रांताध्यक्ष होण्याचा मान

पक्ष स्थापन झाल्यावर प्रांताध्यक्ष होण्याचा मान सर्वप्रथम मला मिळाला. राज्यात पक्षाची कोणतीही बांधणी नसताना काँग्रेस खालोखाल क्रमांक दोनचा पक्ष हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ठरला. तेव्हापासून शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राज्यातील गोरगरीब जनतेच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण काम करत आहोत असे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. शरद पवारांनी मंडल आयोगाच्या माध्यमातून राज्यात आरक्षण मिळवून दिले. या आरक्षणाला नख लावण्याचे काम काही शक्तींकडून होत आहे. मात्र त्याविरोधात आपण सक्षमपणाने लढा देतोय अशी माहितीही छगन भुजबळ यांनी यावेळी दिली. देशात निरनिराळ्या प्रश्नांची माहिती असलेले व त्यांची सोडवणूक करण्याची ताकद असलेले नेते म्हणजे आदरणीय पवारसाहेब आहेत. आपण पवारसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची वाटचाल अधिक वेगाने करण्यासाठी प्रयत्नशील राहूया असे आवाहनही छगन भुजबळ यांनी केले.

# २०१७ ची गुजरातची पुनरावृत्ती २०२२ ला महाराष्ट्रात होणार?

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाविकास आघाडी आणि भाजपने प्रतिष्ठेची केलेली राज्यसभेची सहा जागांसाठीची निवडणुक आज पार पडली. यामुळे निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहीले असतानाच भाजपने मविआच्या तीन आमदारांचे मतदानच रद्द करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. यामुळे मविआच्या नेत्यांची धाकधूक वाढली असून भाजप नेतेही अस्वस्थ झाले आहेत. पण राज्यसभेतला हा रडीचा डाव नवीन नसून याआधी २०१७ साली देखील अशाचप्रकारे गुजरातमध्येही असा प्रकार घडला होता. पण आज महाराष्ट्रातील) राज्यसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती झाल्याचे बोलले जात आहे.

गुजरातमध्ये साली राज्यसभेच्या तीन जागांसाठी मतदान झाले. दोन जागांवर अमित



राज्यात आता गुजरातसारखीच परिस्थिती उद्धवत आहे. जितेंद्र आव्हाड यांनी मतदान केल्यानंतर राष्ट्रवादीच्या जयंत पाटील यांच्याकडे मतपत्रिका दिली तर यशोमती ठाकूर यांनीही नाना पटोलेंकडे मतपत्रिका दिली. नंतर सुहास कांदे यांनीही शिवसेनेबरोबरच राष्ट्रवादीच्या प्रतिनिधीला मतपत्रिका दाखवली असा आरोप करत या तिघांचे मत बाद करण्याची मागणी भाजपने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे. यामुळे सध्या निवडणूक आयोगाने याची शहानिशा करण्यासाठी मतमोजणीच रोखली आहे. दरम्यान, मतमोजणीचे व्हिडीओच निवडणूक आयोगाने मागवले आहेत.

# जितेंद्र आव्हाड आणि यशोमती ठाकूर यांच्या मतदानावर भाजपचा आक्षेप

## भाजपचे आमदार पराग अळवणी यांनी घेतला आक्षेप, 2 मतं बाद करण्याची मागणी

**। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला १-१ मत महत्त्वाचे असताना भाजपकडून आता २ मत बाद करण्याची मागणी करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड, तसेच काँग्रेस नेत्या आणि महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर यांची मतं ग्राह्य धरली जाऊ नये अशी मागणी भाजपकडून करण्यात आली आहे. महाविकास आघाडीच्या चौथ्या उमेदवाराला जिंकवण्यासाठी मतांची आवश्यकता आहे. अशामध्ये भाजपने मतदानावर आक्षेप घेतल्यामुळे मविआची अडचण होऊ शकते. जितेंद्र आव्हाड आणि यशोमती ठाकूर यांनी मत पत्रिका हातामध्ये नेऊन दिल्यामुळे भाजपकडून आक्षेप घेण्यात आला आहे.



राज्यसभेच्या निवडणुकीसाठी आमदारांनी मतदान केलं आहे. आतापर्यंत २५० पेक्षा जास्त आमदारांचे मतदान झाले आहेत. राज्यसभेच्या ६ जागांसाठी ७ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये शिवसेनेचे संजय पवार यांची उमेदवारी धोक्यात आहे. निवडणुकीत मतदान करताना गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड आणि महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर आणि सुहास कांदे यांच्या मतावर भाजप आमदार पराग अळवणी यांनी आक्षेप घेत मत ग्राह्य धरु नये अशी मागणी केली आहे.

मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हातात मतपत्रिका दिली आहे. तर मंत्री यशोमती ठाकूर यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हातात मत पत्रिका दिली आहे. दोन्ही सदस्य मंत्री आहेत. तसेच अशा प्रकारे मतदान करण्याची पद्धत नाही. पक्ष प्रतोदांना आपण कोणाला मतदान करतो हे दाखवण्याची पद्धत आहे. परंतु मत पत्रिका कोणाच्या हातात देण्याची पद्धत नाही. त्यामुळे भाजपचे आमदार पराग अळवणी यांनी आक्षेप घेतला आहे.

### मतदान मात्र ग्राह्यच

आमदार पराग अळवणी यांनी आक्षेप घेतल्यामुळे मतदान थांबवण्यात आले होते. यामध्ये नियमांची पडताळणी करण्यात येत आहे. दरम्यान दोन्ही नेत्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल. परंतु भाजपने आक्षेप घेतल्यामुळे मत बाद करण्यासाठी प्रयत्न सुरु झाले आहेत. जर ही दोन मते बाद झाली तर महाविकास आघाडीचे गणित बदलू शकते. शिवसेनेची जागा आहे ती धोक्यात येऊ शकते. परंतु नियमानुसार मतदान ग्राह्य धरण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

### आदित्य ठाकरेंच्या मत पत्रिकेवर आयोगाचा शिक्का नव्हता

शिवसेना नेते आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या मत पत्रिकेवर निवडणूक आय़ोगाचा शिक्का नव्हता. आदित्य ठाकरे यांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला आहे. परंतु त्यांच्या मत पत्रिकेवर आयोगाचा शिक्का नव्हता. त्यामुळे त्यांना दुसरी मत पत्रिका दिल्यानंतर त्यांनी आपले मत दिलं आहे. मत पत्रिकेवर आयोगाचा शिक्का नव्हता त्यामुळे ते मत ग्राह्य धरण्यात येणार नाही. मत पत्रिकेवर आयोगाचा शिक्का असेल तर मतदान ग्राह्य धरलं जाते.

## शॉर्ट न्यूज »

### दयनीय अवस्था! मृतदेह नेण्यासाठी रुग्णवाहिका मिळाली नाही

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मध्य प्रदेशातील छत्तरपूर जिल्ह्यात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ४ वर्षांच्या मुलीचा मृतदेह नेण्यासाठी रुग्णवाहिका न मिळाल्यामुळे बापाला अखेर मुलीचा मृतदेह खांद्यावर घेऊन जाण्याची वेळ आली. भर उन्हात हा बाप आपल्या मुलीचा मृतदेह खांद्यावर घेऊन जात होता.

मुलीच्या कुटुंबीयांनी सांगितले की त्यांनी तिला सोमवारी बक्सवाह आरोग्य केंद्रात उपचारासाठी नेले जेथे तिची प्रकृती खालावली. त्यानंतर मंगळवारी कुटुंबीयांनी तिला लगतच्या दामोह येथील जिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र त्याच दिवशी तिचा मृत्यू झाला. मुलीचे आजोबा मनसुख अहिरवार यांनी आरोप केला, की त्यांनी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना तिचा मृतदेह घरी नेण्यासाठी रुग्णवाहिका मागितली, परंतु त्यांच्याकडून कोणतेही उत्तर मिळाले नाही.

### राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा समावेश

# महाराष्ट्रासह आणखी तीन राज्यात सुरू आहे राज्यसभा निवडणुकीचा रणसंग्राम

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यसभा निवडणुकीसाठी आज (शुक्रवार) मतदान होत आहे. हे मतदान चार राज्यांमधील १६ रिक्त जागांसाठी होत आहे. या राज्यांमध्ये राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा समावेश आहे. १५ राज्यांतील राज्यसभेच्या एकूण ५७ जागांपैकी ४१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. उमेदवारांची संख्या जागांपेक्षा जास्त असल्याने उर्वरित १६ जागांसाठी आज मतदान होत आहे. सकाळी ९ वाजता मतदानाला सुरुवात झाली असून दुपारी ४ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयोगाने विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली असून संपूर्ण प्रक्रियेची व्हिडिओग्राफी करण्याचे आदेश दिले आहेत.

केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन आणि पीयूष गोयल, काँग्रेसचे उमेदवार रणदीप सुरजेवाला, जयराम रमेश आणि मुकुल वासनिक आणि शिवसेनेचे नेते संजय राऊत हे या निवडणुकीसाठी उमेदवार असून, या सर्व नेत्यांकडून विजयाची अपेक्षा आहे.



भाजपने चार राज्यांत अतिरिक्त आणि अपक्ष उमेदवार उभे केल्याने ही लढत रंजक बनली आहे. क्रॉस व्होटिंग आणि आमदारांचा घोडेबाजारड टाळण्यासाठी काँग्रेसने खास राजस्थान आणि हरियाणाच्या आमदारांना सुरक्षित ठिकाणी ठेवले आहे. त्याचवेळी अपक्ष उमेदवार सुभाष चंद्रा यांच्या माध्यमातून राजस्थानमध्ये संख्याबळ वाढवण्याचा प्रयत्न करणाऱ्या भाजपानेही आपल्या आमदारांना एकसंध ठेवण्यासाठी जोरदार तयारी केली होती.

राज्यसभा निवडणुकीत नवाब मलिक आणि अनिल देशमुख यांना न्यायालयाने मतदानाला परवानगी नाकारल्याने सत्ताधारी महाविकास आघाडीच्या गोटात अस्वस्थता पसरली आहे. त्यांना उच्च न्यायालयात दिलासा मिळावा, असे प्रयत्न आहेत परंतु, आघाडीचे दोन मतांचे गणित बिघडले. हितेंद्र ठाकूर यांच्या पक्षाची तीन मते मिळण्याचा महाविकास आघाडीला

### महाराष्ट्र

राज्यसभेच्या सहा जागांसाठी आज (शुक्रवार) होणाऱ्या निवडणुकीत राज्यात कमालीची चुरस निर्माण झाली आहे. घोडेबाजाराच्या आरोपामुळे गाजलेल्या या निवडणुकीत भाजपा, शिवसेना की काँग्रेसचा उमेदवार 'सातवा' म्हणजे पराभूत होणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. सहा जागांसाठी सात उमेदवार रिंगणात आहेत.

### हरियाणा

हरियाणात दोन जागांसाठी निवडणूक होत आहे. संख्याबळानुसार भाजपा आणि काँग्रेसच्या हातात प्रत्येकी एक जागा यावी. मात्र, भाजपाने याठिकाणी अपक्ष उमेदवार कार्तिकेय शर्मा यांना उभे करून लढत रंजक केली आहे. राज्यात एक जागा जिंकण्यासाठी ३१ आमदारांची गरज आहे. काँग्रेसचे तेवढेच आमदार आहेत. पक्षाने अजय माकन यांना येथे उमेदवारी दिली आहे. माकन हे बाहेरचे असल्याने पक्षात असंतोष आहे. पक्षाच्या एकाही आमदाराने विरोध केला तर माकन यांचा विजयाचा मार्ग अवघड होईल.

### राजस्थान

राजस्थानमध्ये चार जागांवर निवडणूक होत आहे. आकड्यांचा विचार करता यातील तीन जागा काँग्रेसच्या वाट्याला तर एक जागा भाजपाकडे जाईल. मात्र भाजपाने येथे अपक्ष उमेदवार सुभाष चंद्रा यांना पाठिंबा दिला आहे. काँग्रेसने येथून मुकुल वासनिक, रणदीप सुरजेवाला आणि प्रमोद तिवारी यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसकडे १०८ आमदार आहेत, तर १३ अपक्ष, सीपीएमचे दोन आणि बीटीपीचे दोन आमदार सोबत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. मात्र, तिन्ही उमेदवार बाहेरचे असल्याने काँग्रेसला बंडाची भीती आहे. काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या या असंतोषाचा फायदा उठवण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे.

### कर्नाटक

राज्यात चार जागांसाठी निवडणूक होत आहे. काँग्रेसने येथे जयराम रमेश, मन्सूर अली खान यांना उमेदवारी दिली आहे. दुसरा उमेदवार जिंकण्यासाठी काँग्रेसला २० अतिरिक्त मतांची गरज आहे. पक्षाला यापूर्वी जेडीएसकडून पाठिंबा अपेक्षित होता. मात्र त्यांनी कुपेंद्र रेड्डी यांना येथे उतरवले. काँग्रेसमध्ये फूट पडण्याची शक्यता लक्षात घेऊन भाजपाने अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याशिवाय लहरसिंग यांना उमेदवारी दिली. काँग्रेसला जेडीएसचा पाठिंबा मिळाला नाही तर दुसरी जागा जिंकण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

# ४ राज्यात १६ जागांवर राज्यसभा निवडणुकीसाठी मतदान

## कोण मारणार बाजी? महाराष्ट्रात तणावाची परिस्थिती

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

देशातील ४ राज्यांमध्ये राज्यसभेच्या एकूण १६ जागांवर निवडणूक होत आहे. शुक्रवारी राज्यसभेच्या जागांसाठी मतदान सुरु होत आहे. यानंतर लगेच संध्याकाळपर्यंत निवडणुकीचे निकाल समोर येतील. राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक या चार राज्यांमध्ये राज्यसभेच्या निवडणुका होणार आहेत. एका एका मतासाठी राजकीय पक्षांनी आपल्या आमदारांना नजरकैद ठेवलं आहे. एकूणच परिस्थिती टी-२० सामन्यासारखी झाली आहे. सर्वच राज्यांध्ये आपल्या आमदारांना हॉटेलमध्ये ठेवण्यात आले आहे. घोडेबाजार रोखण्यासाठी राजकीय पक्ष प्रयत्न करत आहेत.

महाराष्ट्रात तणावाची परिस्थिती



निर्माण झाली आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेकडून आमदारांवर लक्ष ठेवण्यात आले आहे. आपल्या आमदारांना या राजकीय पक्षांनी हॉटेलमध्ये ठेवलं होते. तसेच हरियाणातील काँग्रेस आमदारांना छत्तीसगडमध्ये नेण्यात आले होते यानंतर गुरुवारी पुन्हा त्यांना दिल्लीत हलवण्यात आले होते. भाजप-जेजेपीने सर्व आमदारांना चंदीगडच्या रिसॉर्टमध्ये ठेवलं होते. तर राजस्थानमध्ये काँग्रेसच्या सर्व आमदारांना उदयपूरच्या हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते. यानंतर मुख्यमंत्री अशोक गहलोत यांच्या देखरेखेखाली त्यांना जयपुरमध्ये आणण्यात आले आहे. दुसऱ्या राजकीय पक्षाच्या प्रलोभनाला आमदार बळी पडू नये यासाठी आमदारांना हॉटेलमध्ये ठेवण्यात आले होते.

### हरियाणामध्ये काँग्रेसला फटका

राज्यसभेच्या दोन जागांसाठी निवडणूक लढवत आहे. एक जागा भाजप आणि दुसरी काँग्रेसकडे जाईल, असे पूर्वी मानले जात होते. मात्र कार्तिकेय शर्मा अपक्ष म्हणून उभे राहिल्याने काँग्रेसचे आणखी एक उमेदवार अजय माकन यांची अडचण झाली आहे. मात्र, पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी आघाडी ठेवली आहे. पण काँग्रेससमोर मोठी अडचण म्हणजे पक्षाचे आमदार कुलदीप शर्मा हे अपक्ष उमेदवार कार्तिकेय शर्मा यांचे सासरे आहेत.

### राज्यसभा निवडणुकीतील प्रमुख चेहरे

राज्यसभा निवडणुकीमध्ये देशात मुख्य उमेदवार आहेत. यामध्ये पीयूष गोयल, निर्मला सीतारामण, काँग्रेस नेता जयराम रमेश, रणदीप सुरजेवाला, अजय माकन, संजय राऊत, शिवसेना आणि एनसीपीचे प्रफुल्ल पटेल यांसारख्या प्रमुख नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

### राजस्थानचे गणित

राजस्थानमध्ये काँग्रेसकडून तीन उमेदवार देण्यात आले आहेत. बीटीपीने काँग्रेसला धक्का दिला आहे. सुभाष चंद्रा अपक्ष उमेदवारी लढवत असल्यामुळे काँग्रेसचे गणित गडबडले आहे. परंतु काँग्रेस तीन जागांवर विजय मिळवेल असा विश्वास मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनी व्यक्त केला आहे.

### महाराष्ट्रात महाविकास आघाडीला झटका

मुंबई हायकोर्टाने राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन आमदारांना म्हणजेच जेलमध्ये असलेल्या नवाब मलिक आणि अनिल देशमुखांचे जामीन अर्ज फेटाळले आहेत. तसेच त्यांना मतदान करण्याची परवानगी देण्यात आली नाही. महाराष्ट्रात ६ जागांवर एकूण ७ उमेदवार रिंगणात आहेत. महाविकास आघाडीला दोन आमदारांचे मत कमी पडणार आहे.

# पूजा हेगडेची इंडिगो एअर लाईन्सविरोधात मोठी तक्रार



बॉलिवूड अभिनेत्री पूजा हेगडे हिने आज देशातील सर्वात प्रमुख विमान कंपनी इंडिगो एअरलाइन्स विरोधात मोठी तक्रार केली आहे. या विमान कंपनीने वाईट वागणुक दिल्याचे म्हणत तिने आक्षेप नोंदवला आहे. इंडिगो एअरलाइन्समध्ये उड्डाण करताना अभिनेत्रीसोबत गैरवर्तन झाल्याचा खुलासा तिने ट्विटद्वारे केला आहे.

पूजा हेगडे हिने ट्विट करत लिहिले की, 'मुंबईहून उड्डाण करत असताना इंडिगो एअरलाइनचे कर्मचारी विपुल नकासे यांनी आमच्याशी अतिशय वाईट वर्तन केले. अतिशय उद्धट, अडाणी आणि अहंकारपूर्ण स्वरात तो बोलला. त्याने आम्हाला धमकी दिली, ही अत्यंत दुःखद गोष्ट आहे. सहसा मी अशा गोष्टींवर ट्विट करत नाही, पण हे वास्तव खरोखरच भयानक होते.

पूजा हेगडेने तिच्या ट्विटमध्ये इंडिगो एअरलाइन्सला टॅग केले असून कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या असभ्य वर्तनाबद्दल सांगितले आहे. या ट्विटला आतापर्यंत 1826 वेळा रिट्विट करण्यात आले असून त्याला 18.9 हजार लाईक्स मिळाले आहेत.

तथापि, पूजा हेगडेच्या या ट्विटला इंडिगो एअरलाइन्सने देखील उत्तर म्हणून त्यांचे प्रमाणित उत्तर दिले आहे. तसेच त्यांचा पीएनआर आणि संपर्क क्रमांक डीएम करण्यास सांगितले आहे. या ट्विटला पूजा हेगडेने अद्याप कोणतेही उत्तर दिलेले नाही.

पूजा हेगडेच्या या ट्विटवर यूजर्स वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहे.



## 'या' पौराणिक मालिकेतून चिन्मय उदगीरकर करतोय निर्मिती क्षेत्रात पदार्पण!

सध्या लोकप्रिय होत असलेल्या या मालिकेची निर्मिती अभिनेता चिन्मय उदगीरकर करत आहे. या मालिकेच्या निमित्ताने पहिल्यांदाच चिन्मयने निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले आहे

मराठी मालिकाविश्वात आत्तापर्यंत जय मल्हार, बाळू मामाच्या नावानं चांगभलं, दख्खनचा राजा ज्योतिबा, श्री लक्ष्मी नारायण, श्री स्वामी समर्थ यांसारख्या अनेक मालिकांना प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. अनेक नवनवीन पौराणिक कथांवर आधारित मालिका दाखवल्यास अशा पौराणिक मालिकांना प्रेक्षकांचाही उत्तम प्रतिसाद मिळतो. आत्तापर्यंत मालिकाविश्वात निर्माण झालेल्या अनेक मालिका आणि त्यातील लोकप्रिय झालेली पात्रं आजही प्रेक्षक विसरलेले नाहीत.आता अशीच एक 'योगयोगेश्वर जय शंकर' ही नवी पौराणिक मालिका मराठी कलर्स वाहिनीवर गेल्या काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीस आली.

चिन्मय उदगीरकरच निर्मिता क्षेत्रात पदार्पण

सध्या लोकप्रिय होत असलेल्या या मालिकेची निर्मिती अभिनेता चिन्मय उदगीरकर करत आहे. या मालिकेच्या निमित्ताने पहिल्यांदाच चिन्मयने निर्मिती क्षेत्रात पदार्पण केले आहे. तसेच चिन्मयची ही पहिलीच पौराणिक मालिका आहे. याआधी चिन्मय 'घाडगे ॲण्ड सून' , 'अग्गबाई सूनबाई' या मालिकांमध्ये काम केले आहे.

मलिकेला प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद

अवघ्या कमी काळात या मालिकेने प्रेक्षकांचे मन जिंकून घेतले आहे. सध्या

## हिंदी टेलिव्हिजन विश्वाची QUEEN

हिंदी टेलिव्हिजन विश्वात निर्मिती क्षेत्रात गेली अनेक वर्षे यशश्वीरित्या वाटचाल करणार निर्माती एकता कपूर हिचे मालिका विश्वात एक मोठं योगदान आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 130 पेक्षा अधिक मालिकांची निर्मिती एकता कपूरने प्रेक्षकांसाठी केली. एकता कपूरची प्रत्येक मालिका ही प्रेक्षकांमध्ये हिट ठरली आहे.

छोटया पडद्यावरील मालिका विश्वात गेली अनेक वर्षे अधिराज्य गाजवणारी निर्माती म्हणजे एकता कपूर. छोट्या पडद्यावर एकता कपूरच्या (EKTA KAPOOR) प्रत्येक मालिकेला प्रेक्षकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला आहे. एकताच्या आजवरच्या गाजलेल्या मालिका आणि एकताच्या या टेलिव्हिजनच्या प्रवासाचा आढावा घेऊया,

एकताने तिच्या वयाच्या १५ व्या वर्षी इंडस्ट्रीमध्ये पदार्पण केले होते. कैलाश सुरेंद्रनाथ यांच्या जाहिरात आणि चित्रपट निर्मिती कंपनीमध्ये काम करण्यास सुरुवात केली होती. त्याचदरम्यान एकताने निर्मिती क्षेत्रात सुद्धा पदार्पण केले होते. पण त्यावेळी मात्र तिला अपयश आले. पहिल्या अपयशानंतर एकताने तिच्या वडिलांच्या सल्ल्यानुसार स्वतःची स्वतंत्र निर्मिती कंपनी स्थापन करणायचा निर्णय घेतला. त्यानंतर



१९९४ मध्ये एकताने (EKTA KAPOOR) तिच्या वडिलांच्या मदतीने 'बालाजी टेलिफिल्म्स' (BALAJI TELEFILMS) या कंपनीची स्थापना केली. मालिकांच्या निर्मिती क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. 'बालाजी टेलिफिल्म' (BALAJI TELEFILMS) या आपल्या स्वतंत्र प्रोडक्शन हाऊस अंतर्गत एकताने आत्तापर्यंत १३० पेक्षा अधिक मालिकांची निर्मिती केली आहे आणि म्हणूनच टेलिव्हिजनची क्विन (QUEEN OF TELEVIDION) असे एकताला म्हटले जाते. तिच्या सर्वच मालिकांना आजतागायत प्रेकक्षकांची सुद्धा उत्तम पसंती मिळाली आहे.

१) हम पांच

झी टीव्ही वरील हम पांच ही मालिका प्रेक्षक आजही विसरू शकत नाहीत. या मालिकेची महत्वाची गोष्ट म्हणजे या मालिकेत एकही पुरुष नायक नव्हता. पाच मुलींन भोवती फिरणारी ही कथा प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिट ठरली होती. या पाच मुलींमध्ये असहाय्य पणे अडकलेल्या वडिलांची भूमिका जेष्ठ अभिनेते अशोक सराफ यांनी साकारली होती. १९९५ ला सुरु झालेली हि मालिका १९९९ पर्यंत टेलिव्हिजन वर प्रेक्षक उत्तम प्रतिसादात पाहत होते.

२) जोधा अकबर

२०१३ ते २०१५ या कालावधीत एकता कपूरची निर्मिती असलेली 'जोधा अकबर' ही मालिका सुद्धा प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिट झाली होती. आमेर कुवरी जोधा आणि मुघल बादशहा अकबर यांची कथा या मालिकेत दाखविण्यात आली होती. या मालिकेतील कलाकारांचा अभिनय आणि एक ऐतिहासिक कथा रंजक पद्धतीने दाखविण्यात आली होती. या मालिकेत रजत टोकस आणि परिधी शर्मा यांच्या मुख्य भूमिका आहेत. ही मालिका सुद्धा हिट ठरली होती.

३) क्यूंकी सास भी कभी बहू थी

क्यूंकी सास भी कभी बहू थी ही मालिका सुद्धा कायमच प्रेक्षकांच्या स्मरणात राहील. या मालिकेपासूनच सासू आणि सुनेच्या नात्यावर भाष्य करणाऱ्या मालिकांचा एक मोठा ट्रेंड सुरु झाला. २००१ ते २००५ या कालावधीत या मालिकेने सर्वोत्कृष्ट मालिका म्हणून 'इंडियन टेलिव्हिजन अकादमी पुरस्कार' सुद्धा पटकावला होता. या मालिकेचे १८०० पेक्षा जास्त भाग प्रदर्शित झाले अजून या मालिकेतील प्रत्येक व्हायक्तिरेखा ही प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे.

४) कहानी घर घर की

क्यूकी सास भी कभी बहू थी आणि कहानी घर घर की या दोन्ही मालिका साधारण एकाच वेळी सुरु झाल्या होत्या. अभिनेत्री साक्षी तन्वर हीला या मालिकेमुळे एक नवी ओळख मिळाली होती.

## शॉर्ट न्यूज »

### ॲथलेटिक्स, जलतरणात छाप; पाच सुवर्णपदकांसह एकूण आठ पदकांची कमाई



। पंचकुला । महाईन्यूज

महाराष्ट्राच्या खेळाडूंनी खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत ॲथलेटिक्समध्ये तीन सुवर्ण, एक रौप्यपदक तर, जलतरणात दोन सुवर्ण आणि दोन कांस्यपदके मिळवली. महाराष्ट्राच्या पदकांमध्ये गुरुवारी पाच सुवर्ण, एक रौप्य व दोन कांस्यपदकांची भर पडली. परंतु हरयाणा ९६ पदकांसह (३३ सुवर्ण, २७ रौप्य, ३६ कांस्य) पदकतालिकेत अग्रस्थानी असून महाराष्ट्र ८५ पदकांसह (३२ सुवर्ण, २८ रौप्य, २५ कांस्य) दुसऱ्या स्थानी आहे.जलतरणातील ४०० मीटर फ्रीस्टाईलमध्ये मुंबईच्या आन्या वालाने सुवर्णपदक मिळवले, तर १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात अपेक्षा फर्नांडिसनेही सुवर्ण कामगिरी केली. १०० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये पुण्याच्या उत्कर्ष गौर व मुंबईच्या पलक जोशीने कांस्यपदक मिळवले.

# प्रतिस्पर्ध्यांच्या घशातून विजय हिसकावून घेणारा 'किलर' फलंदाज

### पहिल्याच सामन्यात त्याने 26 चेंडूत 33 धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेला वेस्ट इंडिजवर विजय

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।



काही क्रिकेटपटू असे असतात, ज्यांना ते कोणत्या देशात आणि कोणत्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध खेळतो आहोत याचा अजिबात फरक पडत नाही. त्यांच्या हातात एकदा बॉल आणि बॅट दिली ते मैदानात आपला झंजावात सुरू करतात. डेव्हिड मिलर हे एक असेच नाव आहे. याच डेव्हिड मिलरने काल (९ जून) झालेल्या टी ट्वेंटी सामन्यात भारतीय संघाच्या हातातून विजय अक्षरश: हिसकावून नेला. दक्षिण आफ्रिकेच्या कालच्या विजयाचा नायक ठरलेला डेव्हिड मिलर आज आपल्या ३३वा वाढदिवस साजरा करत आहे.

सध्या जागतिक क्रिकटेमधील सर्वात घातक फलंदाजांमध्ये समावेश होत असलेल्या मिलरला घरातून क्रिकेटचा वारसा मिळाला होता. त्याचे वडील क्लब क्रिकेट खेळायचे आणि आपल्या मुलानेही क्रिकेट खेळावे असा त्यांचा आग्रह होता. करिअर म्हणून नाही तर निदान शरीर तंदुरुस्त रहावे यासाठी तरी डेव्हिडने क्रिकेट खेळले पाहिजे, असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या इच्छेप्रमाणे डेव्हिडने क्रिकेट खेळण्यास सुरुवात केली होती. याशिवाय, शालेय जीवनात तो टेनिस, हॉकी आणि स्क्वॉशही खेळायचा.

भारतीयांना डेव्हिडची खरी ओळख आयपीएलमधून झाली असली तरी, त्याने २०१० मध्येच टी ट्वेंटीमध्ये पदार्पण केले होते. आंतरराष्ट्रीय पदार्पणापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये तो प्रसिद्ध होता. पदार्पणापाच्या सामन्यात तो सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आला होता. पहिल्याच सामन्यात त्याने २६ चेंडूत ३३ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेला वेस्ट इंडिजवर विजय मिळवून दिला होता.

⏭ भारतीयांना डेव्हिडची खरी ओळख आयपीएलमधून झाली असली तरी, त्याने २०१० मध्येच टी ट्वेंटीमध्ये पदार्पण केले होते. आंतरराष्ट्रीय पदार्पणापूर्वी दक्षिण आफ्रिकेच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये तो प्रसिद्ध होता. पदार्पणापाच्या सामन्यात तो सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आला होता. पहिल्याच सामन्यात त्याने २६ चेंडूत ३३ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिकेला वेस्ट इंडिजवर विजय मिळवून दिला होता.

# ऋषभ पंतने 'नको त्या' गोष्टीत केली विराट कोहलीची बरोबरी

### सामन्यातही भारताचा सात गडी राखून पराभव झाला



। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका टी ट्वेंटी सामना खेळवण्यात आला. या सामन्यामध्ये दक्षिण आफ्रिकेने सात गडी राखून भारताचा पराभव केला. या पराभवामुळे सलग १३ विजय मिळवण्याचा विक्रम करण्यापासून भारतीय संघ वंचित राहिला. काल कर्णधार म्हणून आपला पहिला सामना खेळणाऱ्या ऋषभ पंतच्या नावे एक नकोशा गोष्टीची गोष्टीची नोंद झाली. कर्णधार म्हणून आपला पहिलाच सामना गमावण्याबाबतीत पंतने माजी कर्णधार विराट कोहलीची बरोबरी केली.

दक्षिण आफ्रिकेचा संघ पाच सामन्यांची टी ट्वेंटी मालिका खेळण्यासाठी भारत दौऱ्यावर आला आहे. मालिकेतील पहिला सामना काल दिल्लीमध्ये झाला. या पहिल्या सामन्याच्या पूर्वसंध्येला भारतीय संघाचा कर्णधार के एल राहुल दुखापतीमुळे बाहेर पडला. अशा परिस्थितीमध्ये ऋषभ पंतकडे कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली. पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय टी ट्वेंटी क्रिकेटमध्ये भारताचे नेतृत्व करणारा तो दुसरा सर्वात तरुण कर्णधार ठरला. यापूर्वी, सुरेश रैना सर्वात तरुण कर्णधार ठरला होता. भारताने पाहुण्यांसमोर २११ धावांचे आव्हान ठेवले होते. भारतीय गोलंदाज आपल्या धावसंख्येचा बचाव करू शकले नाहीत. डेव्हिड मिलरच्या ३१ चेंडूत नाबाद ६४ धावा आणि रॅसी व्हॅन डर डुसेनच्या नाबाद ७५ धावांच्या बळावर दक्षिण आफ्रिकेने केवळ १९.१ षटकांतच हे लक्ष्य गाठले. आणि ऋषभ पंतला कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात पराभव स्वीकारावा लागला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही